# ‘मेट्रो-३’ च्या बांधकामाचा छायाचित्रांतून वेध

## ३ ते १६ मार्च दरम्यान छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन

**लोकसत्ता प्रतिनिधी**



दिलीप पिरामल आर्ट गॅलरीत भरविण्यात आलेल्या प्रदर्शनाच्या उद्घाटन वेळी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसी) व्यवस्थापकीय संचालिका आश्विनी भिडे उपस्थित होत्या.

**मुंबई :** ‘कुलाबा - वांद्रे - सीपझ मेट्रो ३’ मार्गिकेचे बांधकाम कसे करण्यात येत आहे, भुयारीकरण कसे करण्यात आले, टीबीएम यंत्र कसे मुंबईच्या भूगर्भात सोडण्यात आले, भुयारी मेट्रोची निर्मिती करताना कोणती आव्हाने आहेत, ही आव्हाने कशी पेलली जात आहेत याची माहिती देणारे प्रदर्शन मुंबईत भरविण्यात आले आहे. नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्सने (एनसीपीए) नूतनीकरण केलेल्या दिलीप पिरामल आर्ट गॅलरीत ३ ते १६ मार्चदरम्यान हे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

नूतनीकरण करण्यात आलेली गॅलरी आणि या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी करण्यात आले. यावेळी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसी) व्यवस्थापकीय संचालिका आश्विनी भिडे उपस्थित होत्या. मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गाच्या बांधकामादरम्यानची चित्तथरारक दृष्ये छायाचित्राच्या माध्यमातून पाहण्याची, तसेच अभियांत्रिकी आविष्कार, प्रकल्पाची जटिलता समजून घेण्याची संधी प्रदर्शनाच्या निमित्ताने मिळणार आहे. महत्त्वाचे म्हणजे ‘मेट्रो ३’सह मुंबई सागरी मार्ग आणि मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या (शिवडी - न्हावाशेवा सागरी सेतू) बांधकामाची माहिती या प्रदर्शना उपलब्ध करण्यात आली आहे. मुंबईकरांना ३ ते १६ मार्च २०२३ दरम्यान दुपारी १२ ते रात्री ८ या वेळेत हे प्रदर्शन पाहता येणार आहे. दरम्यान, ‘मेट्रो ३’ प्रकल्पाचे एकूण ७९.८ टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. तर आरे-बीकेसी या पहिल्या टप्प्याचे ८५.२ टक्के, बीकेसी - कफ परेड या दुसऱ्या टप्प्याचे ७६ टक्के बांधकाम पूर्ण झाल्याची माहिती एमएमआरसीएलच्या अधिकाऱ्यांनी दिली.